जाहीर नोटीस

दिवाणी न्यायालय, देवरुख या न्यायालयात

दिनांक:—०३/११/२०२५

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, ...

दिवाणी न्यायालय, देवरुख या न्यायालयामध्ये मुख्य प्रवेशद्वाराजवळ ई—सेवा केंद्र पोर्टा केबीन बसविणेत आलेली आहे. सदर ई—सेवा केंद्राचे पोर्टा केबीन मध्ये इलेक्ट्रीक पॉइंट उपलब्ध आहेत. तरी, त्याठिकाणी न्यायालयाच्या इमारतीमधून विद्युत प्रवाह (इलेक्ट्रीक सप्लाय) पुरविणेचे आहे.

तरी ज्या कोणाला वर नमूद केलेप्रमाणे दिवाणी न्यायालय, देवरुख येथे न्यायालयाच्या इमारतीमधून विद्युत प्रवाह (इलेक्ट्रीक सप्लाय) उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल, त्यांनी दरपत्रके (निविदा) खालील अटी व शर्तीस अधिन राहून ही नोटीस दिवाणी न्यायालय, देवरुख येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून आठ दिवासांचे आत म्हणजेच दिनांक १०/११/२०२५ पर्यंत दिवाणी न्यायालय, देवरुख येथे समक्ष आणून द्यावीत.

दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तूची किंमत इत्यादी बाबी स्वतंत्र नमूद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमूद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. सदर लखोटयावर ई—सेवाकेंद्रामध्ये इलेक्ट्रीक सप्लाय पुरविणे बाबतचे दरपत्रक असे नमुद असावे व लखोटा सील बंद असावा.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत येणारे इलेक्ट्रीक साहित्य उत्तम प्रतिचे असणे आवश्यक आहे. सदरचे पुरविणेत आलेले साहित्य दुय्यम प्रतिचे असल्यास व काही बिघाड झाल्यास अथवा मागणी केलेप्रमाणे नसल्यास सदरचे साहित्य पुन्हा नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

सा. ता. 05/11/2025

अधीक्षक (आस्थापना)
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

मु.मा.ई.१०३८३

६. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख यांना राहिल.

आज दि. ०३/११/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

दिनांक —०३/११/२०२५

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
देवरुख

म.जा.क. आस्था/ १७०६/२०२५
दिवाणी न्यायालय, देवरुख
दिनांक:—०३/११/२०२५

प्रत प्रसिध्दीसाठी:—

१. मा.जिल्हा न्यायालय, रत्नागिरीचे नोटीस बोर्डवर
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, रत्नागिरी यांजकडे वेबसाईटवर प्रसिध्दी करिता
३. दिवाणी न्यायालय, क.स्तर, देवरुख चे नोटीस बोर्डवर

सही/—

दिनांक —०३/११/२०२५

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
देवरुख